## नियमीत दिवाणी दावा क्रं. ५९/१९९२ मधील नि. १४३ खाली आदेश

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ठराव व ताकिदीसाठी दाखल केला आहे.

**०२.** सदर दाव्यातील सदर दाव्यामध्ये वादीचे पूर्वीचे वकील यांनी अचानक वकीपत्र रद्द केलेमुळे मे. न्यायालयाने सदर दाव्यातील सर्व वादींना समज पाठविलेली होती. त्यापैकी वादी क्र. १ इ सौ. मंगल बाळू धोत्रे हे दि. २९/१०/२०१२ रोजी मयत असलेबाबत रिपोर्ट मे. न्यायालयामध्ये दाखल झालेला आहे. सदर वादी क्र. १ इ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे.

**०३.** तसेच प्रतिवादी क्र. १ कृष्णा तुकाराम शेटे हे दि. २८/०७/२०२० रोजी झाले असून त्यांचे वारसही दाव्याचे कामकाज पुढे चालवणेसाठी रेकार्डवर घेणे आवश्यक आहे. सबब, सदर वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावे अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०४.** सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, विलंब माफीचा अर्ज प्रलंबित आहे. वारसाचे नाव व इतर माहिती घेण्याची आहे.

**०५.** वादी यांचा अबेटमेंट सेट असाईड (नि.क्र.१४१) चा अर्ज व विलंब माफी अर्ज (नि.१३९) मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. मुळ दाव्याच्या अनुषंगाने वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ च्या वारसा बाबत पुढील तारखेस न चुकता दुरुस्ती करावी.

NEHA K NAGARGOJE
Digitally signed by NEHA K NAGARGOJE
Date: 2024.07.06 11:31:19 +0530

दि.२९.०६.२०२४.
भोर

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

**CERTIFICATE**

“I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon’ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 29/06/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 05/07/2024 |
| Order uploaded on | – | 06/07/2024 |